असा. क्र. ४० रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, ऑगस्ट ११, २००३/श्रावण २०, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.—महाराष्ट्र राज्यात माहितीचा अधिकार परिणामकारक रीतीने प्राप्त करण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आणि तत्संबंधी व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम. | २८२–२९१ |

दिनांक १० ऑगस्ट २००३ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.
विधी व न्याय विभाग.

### सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ११ ऑगस्ट २००३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र राज्यात माहितीचा अधिकार परिणामकारक रीतीने प्राप्त करण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आणि तत्संबंधी व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.

**ज्याअर्थी,** भारताचे संविधान याच्या अनुच्छेद १९(१) अन्वये नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचा एक भाग म्हणून सर्वोच्च न्यायालयाने माहितीच्या अधिकारास मान्यता दिलेली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** माहितीचा अधिकार हा लोकशाहीचा पाया असून त्यामुळे राज्याच्या राजकारभारात पारदर्शकता, खुलेपणा व जबाबदारीची जाणीव आणणे सुलभ होईल आणि लोकशाही समाजव्यवस्थेमध्ये जनतेच्या प्रभावी सहभागाची सुनिश्चिती होईल ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात माहितीचा अधिकार परिणामकारक रीतीने प्राप्त करण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आणि तत्संबंधी किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** श्री. चुनीलाल करसनदास ठक्कर, हे महाराष्ट्राचे राज्यपाल यांची कार्ये पार पाडताना, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, कायदा करण्याकरिता, त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून त्यांनी दिनांक २३ सप्टेंबर २००२ रोजी, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश, २००२ हा प्रख्यापित केला होता ; २००२ चा महा अध्या. १०.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या त्रेपन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक २३ सप्टेंबर २००२ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) " अपील प्राधिकरण " याचा अर्थ, खंड (३) मध्ये नमूद केलेला संबंधित सक्षम प्राधिकारी, असा आहे आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, अपील प्राधिकारी म्हणून कृती करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या अशा अधिकाऱ्याचा किंवा अधिकाऱ्यांचादेखील त्यात समावेश असेल ;

(२) " समिती " याचा अर्थ, शासनाचे अपर मुख्य सचिव (गृह) हे अध्यक्षस्थानी असलेली आणि शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेले अन्य दोन सदस्य असलेली, कलम ७ (क) च्या प्रयोजनांकरिता, या बाबतीत काढण्यात आलेल्या आदेशाद्वारे शासनाने घटित केलेली समिती, असा आहे ;

(३) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ,—

(एक) राज्य शासनाच्या प्रत्येक प्रशासकीय विभागाचा प्रमुख ;

(दोन) राज्यातील शासकीय व इतर प्राधिकरणांचे प्रशासकीय प्रमुख ;

(तीन) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांकरिता, सहकारी संस्थांचे निबंधक ; १९६१ चा महा. २४.

(चार) सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी झालेल्या सोसायट्यांकरिता सोसायटींचे निबंधक ; १८६० चा २१.

१९५० चा मुंबई २९. (पाच) धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयाचे आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेकरिता धर्मादाय आयुक्त ;

(सहा) कामगार आयुक्ताकडे नोंदणी झालेल्या श्रमिक संघांकरिता कामगार आयुक्त ;

(सात) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रशासकीय शाखेकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सचिव ;

(आठ) लोकायुक्त आणि उप लोकायुक्तांच्या कार्यालयाच्या प्रशासकीय शाखेकरिता लोकायुक्त आणि उप लोकआयुक्तांचे प्रबंधक,

असा आहे ;

(४) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(५) " माहिती " याचा अर्थ, शासनाच्या आणि कोणत्याही शासकीय प्राधिकरणाच्या कारभारासंबंधातील कोणत्याही बाबीविषयीची माहिती, असा आहे आणि त्यात, दस्तऐवज, डिस्केट्स, फ्लॉफी किंवा अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक प्रकार यामधील कोणत्याही अभिलेखाच्या प्रतीचा समावेश होतो ;

(६) " शासकीय प्राधिकरण " याचा अर्थ, कोणत्याही केंद्रीय किंवा राज्य कायद्याद्वारे स्थापना केलेले किंवा घटित केलेले कोणतेही प्राधिकरण किंवा संस्था, असा आहे आणि त्यात, राज्याची मालकी असलेली व राज्याकडून नियंत्रित केलेली कोणतीही संस्था किंवा ज्या संस्थेला शासनाकडून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणतेही सहाय्य मिळते, अशी इतर कोणतीही संस्था यांचा समावेश होतो आणि त्यात, ज्या संस्थांची रचना व प्रशासन प्रामुख्याने शासनाकडून नियंत्रित केले जाते किंवा अशा ज्या संस्थेची कार्ये सार्वजनिक स्वरूपाची किंवा हिताची आहेत किंवा ज्या संस्थेचे पदाधिकारी शासनाने नियुक्त केलेले आहेत, अशा संस्थांचाही समावेश होईल.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, " सहाय्य " या शब्दप्रयोगामध्ये, सवलतीच्या दराने शासकीय जमिनीच्या स्वरूपातील शासकीय सहाय्य किंवा शासनाकडून दिल्या जाणाऱ्या किंवा वेळोवेळी, विनिर्दिष्ट केल्या जाणाऱ्या, कर इत्यादीपासूनच्या सुट देण्यासारख्या इतर कोणत्याही आर्थिक सवलती, यांचा समावेश होईल ;

(७) " शासकीय माहिती अधिकारी " याचा अर्थ, कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याने पदनिर्देशित केलेला अधिकारी, असा आहे आणि त्यात, या अधिनियमाखाली आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी शासकीय माहिती अधिकाऱ्याकडून ज्याचे सहाय्य घेतले जाते अशा अधिकाऱ्याचा किंवा कर्मचाऱ्याचा समावेश असेल ;

(८) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(९) " अभिलेख " याचा अर्थ,—

(एक) कोणताही दस्तऐवज, हस्तलिखित किंवा फाईल ,

(दोन) दस्तऐवजाचा कोणताही सूक्ष्मपट (मायक्रोफिल्म), सूक्ष्म चित्रपट्टिका (मायक्रोफिच) आणि प्रतिरूप (फॅक्सिमिल) प्रत ,

(तीन) अशा सूक्ष्मपटामध्ये संनिविष्ट केलेल्या प्रतिमेची किंवा प्रतिमांची कोणतीही पुनर्निर्मिती (मग त्या परिवर्धित केलेल्या असोत वा नसोत) , आणि

(चार) संगणकाद्वारे किंवा अन्य कोणत्याही साधनाद्वारे निर्माण करण्यात आलेले इतर कोणतेही साहित्य,

असा आहे आणि त्यात या सर्वांचा समावेश होतो ;

(१०) " राज्य " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे.

माहितीचा अधिकार. ३. या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून प्रत्येक नागरिकाला माहिती मिळवण्याचा अधिकार असेल.

शासकीय प्राधिकरणावरील बंधने. ४. प्रत्येक सक्षम प्राधिकारी,—

(क) त्याच्या कामकाजाच्या आवश्यकतेनुसार सुसंगत अशा रीतीने आणि अशा नमुन्यात आपले सर्व अभिलेख रीतसर तालिकाबद्ध व निर्देश सूचीबद्ध करून ठेवील ;

(ख) विहित केलेल्या रीतीने वेळोवेळी,—

(एक) त्याच्या संघटनेचा, कार्याचा आणि कर्तव्यांचा तपशील ,

(दोन) त्याचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत त्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती,

(तीन) त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी शासकीय प्राधिकरणाने ठरवून दिलेली प्रमाणके,

(चार) नागरिकांना उपलब्ध करून देता येतील असे नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका, शासन निर्णय, आदेश व मार्गदर्शिका आणि कार्यालयात असलेल्या अभिलेखांची यादी,

(पाच) माहिती मिळवण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचा तपशील,

(सहा) शासकीय माहिती अधिकाऱ्याचे नाव, पदनाम आणि इतर तपशील, आणि

(सात) संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल अशी अतिरिक्त माहिती,

प्रसिद्ध करील ;

(ग) जे निर्णय आणि धोरणे घोषित केल्यावर त्याचा जनतेवर परिणाम होतो अशा महत्त्वाच्या प्रशासकीय किंवा न्यायिकवत निर्णयाशी आणि धोरणांशी संबंधित सर्व प्रस्तुत वस्तुस्थिती प्रसिद्ध करील ;

(घ) कोणताही प्रकल्प सुरू करण्यापूर्वी, जनतेला सर्वसाधारणपणे आणि खास करून प्रकल्पबाधित व्यक्तींना, त्याच्याकडे उपलब्ध असलेली किंवा त्याला सहज प्राप्त असलेली आणि त्या बाधित व्यक्तींना त्यांच्या मते जी कळणे आवश्यक असेल अशी माहिती प्रसिद्ध करील किंवा कळवील.

शासकीय माहिती अधिकाऱ्यांची नियुक्ती. ५. (१) प्रत्येक सक्षम प्राधिकारी, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, अशा प्राधिकाऱ्याच्या नियंत्रणाखालील सर्व प्रशासकीय युनिटे आणि कार्यालये यांमध्ये शासकीय माहिती अधिकारी म्हणून एका किंवा अधिक अधिकाऱ्यांना पदनिर्देशित करील.

(२) प्रत्येक शासकीय माहिती अधिकारी, माहितीसाठी केलेल्या विनंतीबाबत कार्यवाही करील आणि अशी माहिती मागणाऱ्या व्यक्तीस वाजवी सहाय्य करील.

(३) शासकीय माहिती अधिकाऱ्यास, त्याची कर्तव्ये उचितपणे बजावण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशा इतर अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्याचे सहाय्य घेता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये ज्या कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्याचे सहाय्य मागितले असेल तो, त्याचे सहाय्य मागणाऱ्या शासकीय माहिती अधिकाऱ्यास सर्वतोपरी सहाय्य करील.

६. (१) माहिती मिळवण्याची इच्छा असलेली व्यक्ती विहित रीतीने आणि विहित करण्यात येईल अशा शुल्कासह, अशा नमुन्यात आणि अशा तपशीलासह, शासकीय माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज करील. माहिती मिळविण्याची कार्यपद्धती.

(२) पोट-कलम (१) अन्वये माहिती मिळण्याची विनंती करणारा अर्ज मिळाल्यानंतर, शासकीय माहिती अधिकारी, शक्य तितक्या शीघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत, तो अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा कामाच्या दिवसांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीत, एकतर मागितलेली माहिती पुरवील किंवा या अधिनियमाच्या तरतुदींन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणांकरिता तो माहितीची मागणी फेटाळील :

परंतु, योग्य प्रकरणामध्ये, ही कालमर्यादा, कारणे नमूद करून आणि अर्जदाराला ती कळवून, आणखी पंधरा कामाच्या दिवसांनी वाढविता येईल :

परंतु आणखी असे की, आवश्यक ती माहिती देण्यासाठीचे मूल्य दर्शविणाऱ्या, विहित फी व्यतिरिक्त कोणत्याही अतिरिक्त फीचे प्रदान केल्यावर एखादी माहिती देण्याचे ठरविण्यात आले असेल त्या बाबतीत, शासकीय माहिती अधिकारी, त्याने निश्चित केलेल्या अतिरिक्त फीचा तपशील देणारी सूचना अर्जदारास पाठवील व अर्जदाराने ती अतिरिक्त फी जमा करावी अशी त्यास विनंती करील आणि उक्त सूचना त्याला पाठवण्यात आल्यापासून ते अशा अतिरिक्त फीचे प्रदान होईपर्यंतचा दरम्यानचा काही कालावधी असल्यास तो, या पोट-कलमामध्ये निर्दिष्ट केलेला पंधरा कामाच्या दिवसांचा कालावधी किंवा, यथास्थिति, जादा पंधरा दिवसांचा कालावधी, मोजण्याच्या प्रयोजनार्थ वगळण्यात येईल :

परंतु तसेच, विहित फी, किंवा यथास्थिति, देय असलेली अतिरिक्त फी ही, माहिती पुरविण्याच्या प्रत्यक्ष खर्चापेक्षा अधिक असणार नाही.

(३) पोट-कलम (२) अन्वये जेव्हा एखादी मागणी फेटाळण्यात येईल तेव्हा त्या बाबतीत, शासकीय माहिती अधिकारी, मागणी करणाऱ्या व्यक्तीस,—

(एक) मागणी फेटाळण्यामागील कारणे ;

(दोन) मागणी फेटाळण्याविरुद्ध ज्या कालावधीत अपील दाखल करता येईल, तो कालावधी ; आणि

(तीन) ज्याच्याकडे अर्जदाराने अपील दाखल करावयाचे तो अधिकारी किंवा प्राधिकारी, या गोष्टी लेखी कळवील.

(४) शासकीय प्राधिकरणाने ज्या भाषेमध्ये व ज्या नमुन्यामध्ये माहिती ठेवली असेल, त्या भाषेमध्ये व त्या नमुन्यामध्ये माहिती देण्यात येईल.

(५) जेव्हा जेव्हा व जेथे जेथे, मागणी केलेली माहिती ही, एखाद्या व्यक्तीचे जीवन व स्वातंत्र्य यांच्याशी संबंधित असेल तेव्हा तेव्हा व तेथे तेथे, ती माहिती, कलम ७ च्या तरतुदींना अधीन राहून, अर्ज मिळाल्यापासून चोवीस तासांच्या आत त्या अर्जदारास पुरविण्यात येईल.

७. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीस,— माहिती उघड करण्यातून सूट.

(क) जी माहिती उघड करण्याने भारताचे सार्वभौमत्व व एकात्मता, राज्याची सुरक्षितता किंवा हित, विदेशी राज्याशी असलेले संबंध यांवर बाधकरित्या परिणामक होईल किंवा एखाद्या अपराधास चिथावणी मिळेल, अशी माहिती देण्यात येणार नाही :

परंतु, जेव्हा जेव्हा मागितलेली कोणतीही माहिती वर नमूद केलेल्या कारणांसाठी रोखून ठेवावयाची असेल तेव्हा तेव्हा, अशा माहितीसाठी करण्यात आलेली विनंती, शासकीय माहिती अधिकारी, सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत ताबडतोब समितीपुढे विचारार्थ आणि निर्णयार्थ मांडील :

परंतु, आणखी असे की, शासकीय माहिती अधिकारी, ती विनंती नाकारण्यासाठी अशा समितीकडून मान्यता मिळवल्यावर, असा नकार अर्जदाराला कळविताना, समितीच्या मान्यतेने असा नकार देण्यात आला आहे, हे नमूद करील ;

(ख) जी माहिती प्रसिद्ध करण्यास कोणत्याही न्यायालयाकडून किंवा न्यायाधिकरणाकडून स्पष्टपणे मनाई करण्यात आली असेल किंवा जी उघड करण्याने न्यायालयाचा अवमान होत असेल, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(ग) जी माहिती उघड करण्याने, संसदेच्या अथवा राज्य विधानमंडळाच्या विशेषाधिकारांचा भंग होत असेल, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(घ) वाणिज्य क्षेत्रातील विश्वास, व्यापारविषयक गुपिते किंवा बौद्धिक संपदा यांसारखी जी माहिती, उघड करण्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल ती माहिती उघड केल्याने अधिकाधिक लोकहिताची हमी मिळेल, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटलेली असल्याखेरीज, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(ङ) एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे त्याला उपलब्ध झालेली माहिती— जी माहिती उघड केल्याने अधिकाधिक लोकहिताची हमी मिळेल, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटलेली असल्याखेरीज—देण्यात येणार नाही ;

(च) एखाद्या व्यक्तीच्या सेवा अभिलेखाशी संबंधित असलेली माहिती देण्यात येणार नाही ;

(छ) विदेशी सरकार किंवा आंतरराष्ट्रीय संघटना यांच्याकडून गुप्तपणे मिळालेली माहिती देण्यात येणार नाही ;

(ज) जी माहिती उघड करण्याने, कोणत्याही व्यक्तीचे जीवन किंवा शारीरिक सुरक्षितता धोक्यात येईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षिततेच्या प्रयोजनांसाठी गुप्तपणे दिलेल्या माहितीचे सूत्र किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(झ) शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ च्या तरतुदीन्वये जी उघड करण्यास मनाई केली आहे, अशी माहिती देण्यात येणार नाही ; १९२३ चा १९.

(ञ) ज्यामुळे गुन्हेगारांचे अन्वेषण करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे यामध्ये अडथळा येईल, अशी माहिती देण्यात येणार नाही ; आणि

(ट) जी माहिती उघड करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी कोणताही संबंध नसेल किंवा जी उघड केल्याने व्यक्तीच्या खाजगीपणाचे विनाकारण उल्लंघन होईल अशी वैयक्तिक माहितीशी संबंधित असलेली माहिती, व्यापक लोकहिताच्या दृष्टीने ती उघड करणे आवश्यक आहे, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटलेली असल्याखेरीज देण्यात येणार नाही.

विवक्षित प्रकरणांमध्ये माहिती देण्यास नकार देण्याची कारणे.

**८.** कलम ७ च्या तरतुदींना बाध न येता, शासकीय माहिती अधिकाऱ्यास पुढील बाबतीत माहिती पुरविण्याच्या विनंतीस, नकार देता येईल :—

(क) जेव्हा माहिती ही आधीच **राजपत्रात** किंवा अन्यत्र प्रसिद्ध झालेली असून ती जनतेला उपलब्ध आहे किंवा ती अशा स्वरूपाची आहे की परत मिळविणे किंवा संस्करण करणे आवश्यक असलेल्या त्या मोठ्या प्रमाणातील माहितीसाठी शासकीय प्राधिकरणाच्या साधनसामग्रीचा प्रमाणाबाहेर वापर करावा लागेल :

परंतु, उपरोक्त कारणावरून जेव्हा अशी विनंती नाकारली असेल तेव्हा, माहिती मागणाऱ्या व्यक्तीला, ज्यायोगे माहितीचा पुरवठा करणे सुकर होईल अशा रीतीने ती विनंती पुन्हा सादर करण्यास शक्य होईल तितकी मदत करणे हे शासकीय माहिती अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल ;

(ख) जेव्हा ती माहिती अशा माहितीशी संबंधित असेल की, जी कायदा, नियम, विनियम किंवा आदेश यांद्वारे विशिष्ट वेळी प्रसिद्ध करणे आवश्यक असेल.

९. (१) कलम ७ च्या तरतुदींना बाध न येता,— इतर माहिती.

(क) एखाद्या प्रकरणात निर्णय प्रक्रियेशी संबंधित असलेली माहिती, कोणत्याही अर्जदारास, अशा प्रकरणी निर्णय घेण्यात आल्यानंतर किंवा निर्णय घेतला असल्याचे मानण्यात आल्यानंतर आणि ते प्रकरण पूर्ण झाल्यावर किंवा समाप्त झाल्यावर, उपलब्ध करून देण्यात येईल ;

(ख) कलम ६ च्या पोट-कलम (१) खाली केलेल्या कोणत्याही विनंतीच्या दिनांकापूर्वीच्या पंधरा वर्षापूर्वी झाली असेल, उद्‌भवली असेल, घडली असेल अशी कोणतीही घटना, प्रसंग किंवा बाब या संबंधातील कोणतीही माहिती अशी विनंती करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस पुरविण्यात येईल.

(२) संसदेपासून किंवा राज्य विधानमंडळापासून जी रोखून ठेवता येत नसेल अशी कोणतीही माहिती, या अधिनियमाच्या तरतुदींखाली अर्जदारास अवश्य उपलब्ध करून दिली जाईल.

१०. ज्या माहितीसाठी एखादी विनंती करण्यात आली असेल ती माहिती, जर या अधिनियमान्वये उघड करण्यापासून सूट दिली आहे अशा माहितीचा समावेश नसलेल्या अभिलेखाच्या भागामधून देणे शक्य असेल किंवा ती माहिती जर, सूट दिलेल्या माहितीचा समावेश असलेल्या अभिलेखाच्या कोणत्याही भागापासून वाजवी रीत्या पृथक करता येण्याजोगी असेल तर, ती माहिती उघड करण्यापासून सूट दिलेल्या एखाद्या माहितीशी किंवा अभिलेखाशी संबंधित आहे, या कारणावरून ती विनंती पूर्णपणे नाकारता येणार नाही. पृथक्करण योग्यता.

११. (१) (एक) शासकीय माहिती अधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत ; किंवा अपिले.

(दोन) ज्या व्यक्तीला, कलम ६ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असा अर्ज केल्याच्या दिनांकापासून, पंधरा कामाच्या दिवसांच्या कालावधीच्या आत किंवा उक्त पोट-कलम (२) च्या दुसऱ्या परंतुकामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वाढीव कालावधीच्या आत, काही कळविण्यात आले नसेल अशा कोणत्याही व्यक्तीस,

असा कालावधी व्यपगत झाल्यापासून, तीस दिवसांच्या कालावधीच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा फीसह अपील प्राधिकरणाकडे अपील करता येईल :

परंतु, जेव्हा कलम ७ च्या खंड (क) अन्वये शासकीय माहिती अधिकारी उक्त खंड (क) च्या परंतुकामध्ये निर्देशिलेल्या समितीच्या मान्यतेने, आदेश काढील, तेव्हा, अशा आदेशाविरुद्धचे अपील फक्त लोकायुक्ताकडे किंवा उप लोकायुक्तांकडेच दाखल केले जाईल.

(२) अपील प्राधिकरणास, बाधित झालेल्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

(३) अपील प्राधिकरणाच्या पोट-कलम (२) खालील आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस; असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, राज्याच्या लोकायुक्ताकडे, किंवा यथास्थिति, उप लोकायुक्ताकडे, दुसरे अपील दाखल करता येईल.

(४) पोट-कलमे (१) आणि (३) मध्ये निर्देशिलेली अपिले, अशी अपिले मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत किंवा तीस दिवसांपेक्षा आणखी अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत, कालावधी अशाप्रकारे वाढविल्याची कारणे नमूद करून, शक्यतोवर निकालात काढण्यात येतील.

(५) लोकायुक्त किंवा, यथास्थिति, उप लोकायुक्तांचा अपिलांवरील निर्णय अंतिम असेल.

शास्ती. **१२.** (१) जेव्हा कोणत्याही शासकीय माहिती अधिकाऱ्याने कलम ६ च्या पोट-कलम (२) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत, मागितलेली माहिती देण्यात कोणत्याही योग्य कारणाशिवाय कसूर केली असेल तेव्हा, अपील प्राधिकरणास अशा अपिलामध्ये, शासकीय माहिती अधिकाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, माहिती देण्यास विलंब केल्याच्या प्रत्येक दिवसाकरिता दोनशे पन्नास रुपये एवढ्या रकमेची शास्ती लादता येईल.

(२) कोणत्याही शासकीय माहिती अधिकाऱ्याने, जाणूनबुजून,—

(क) चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती, किंवा

(ख) सदोष किंवा अपूर्ण माहिती,

दिली असल्याचे अपिलामध्ये आढळून आले असेल तेथे, अपील प्राधिकरणास, शासकीय माहिती अधिकाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्याला योग्य वाटेल त्यानुसार, अशा अधिकाऱ्यावर दोन हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढी शास्ती लादता येईल.

(३) अपील प्राधिकरणाच्या आदेशाविरुद्ध, लोकायुक्त किंवा उप लोकायुक्त यांच्याकडे अपील करता येईल आणि कलम ११ ची पोट-कलमे (३), (४) व (५) यांच्या तरतुदी, अशा अपिलास, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

(४) अपील प्राधिकरणाने, पोट-कलमे (१) व (२) यांअन्वये लादलेली शास्ती, संबंधित शासकीय माहिती अधिकाऱ्याच्या वेतनातून वसुलीयोग्य असेल, किंवा वेतन काढण्यात येत नसेल तर ती, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य असेल.

(५) ज्या शासकीय अधिकाऱ्यावर, पोट-कलमे (१) व (२) यांअन्वये शास्ती लादलेली आहे अशा अधिकाऱ्यावर, त्याला लागू असलेल्या सेवेच्या नियमांन्वये योग्य ती शिस्तभंगाची कारवाई केली जाण्यास देखील तो पात्र असेल.

परिषदा घटित करणे. **१३.** (१) शासन, या अधिनियमाच्या कामकाजाचे संनियंत्रण करण्यासाठी राज्य स्तरावर मुख्य सचिवाच्या किंवा कोणत्याही अपर मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली, आणि प्रत्येक महसुली विभागासाठी संबंधित विभागीय आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली, एक परिषद स्थापन करील. अशा परिषदेमध्ये सर्वसाधारणपणे, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे समाजातील नामवंत व प्रतिष्ठित व्यक्ती आणि प्रसारमाध्यमे व अशासकीय संघटना यांचे प्रतिनिधी व शिक्षण तज्ज्ञ, यांचा समावेश असेल.

(२) परिषद, सहा महिन्यांतून किमान एकदा अधिनियमाच्या कामाचा आढावा घेईल आणि शासनाला यथोचित शिफारशी करील.

अभिलेख आयोग घटित करणे. **१४.** (१) शासन, शासनाचे प्रतिनिधी, विहित करण्यात येतील अशा समाजातील नामवंत व प्रतिष्ठित व्यक्ती आणि शिक्षण तज्ज्ञ यांचा मिळून बनलेला अभिलेख आयोग स्थापन करील. जुने अभिलेख, जनतेच्या माहितीकरिता उपलब्ध करून देण्यासाठी खुले करण्याबाबत शासनाला सल्ला देणे, हे अभिलेख आयोगाचे कर्तव्य असेल.

(२) अभिलेख आयोगाचा निर्णय शासनावर बंधनकारक असेल आणि शासनाने कारणे नमूद करून आयोगाचा निर्णय अमान्य करण्याचे ठरवलेले नसल्यास, तीन महिन्यांच्या आत त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल.

(३) अभिलेख आयोगाचा निर्णय अमान्य करण्यात आल्याच्या प्रत्येक प्रकरणी, शासन राज्य विधानमंडळाला लवकरात लवकर तसे निवेदन सादर करील.

१५. या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी, कोणताही शासकीय कर्मचारी किंवा अधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही. सद्भावनेने केलेल्या कृतीला संरक्षण.

१६. कोणतेही न्यायालय, या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या संबंधातील कोणताही दावा, अर्ज किंवा अन्य कार्यवाही दाखल करून घेणार नाही आणि या अधिनियमान्वये करण्यात येणारे अपील वगळता, अशा आदेशास आव्हान देता येणार नाही. न्यायालयांच्या अधिकारितेस रोध.

१७. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्यात किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांत, विनियमांत किंवा आदेशात या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत असे काहीही असले तरी, या तरतुदी परिणामक्षम असतील. अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे.

१८. (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) प्रथमच तयार करण्यात आलेल्या नियमांखेरीज, या अधिनियमान्वये तयार केलेले सर्व नियम, पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनांत, मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्यामध्ये अशा प्रकारे तो ठेवण्यात येईल ते अधिवेशन किंवा त्या अधिवेशनाच्या लगतनंतरचे अधिवेशन, समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल आणि तशा अर्थाचा त्यांचा निर्णय ते **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, असा निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

१९. (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, शासनास, प्रसंगानुरूप अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक व इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यावर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याचे निरसन.

**२०.** महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००० हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००० चा महा. ३८.

सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० याचे निरसन व व्यावृत्ती.

**२१.** (१) महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश, २००२ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००० चा महा. अध्या. १०.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) या अधिनियमान्वये करण्यात आलेली गोष्ट, कार्यवाही किंवा यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ४१ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

मंगळवार, ऑगस्ट १२, २००३/श्रावण २१, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

### शुद्धीपत्र

**महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण, भाग चार, दिनांक ११ ऑगस्ट २००३ मध्ये, पृष्ठ क्रमांक २८२-२९१ वर प्रकाशित करण्यात आलेल्या महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ (सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१) मध्ये, पृष्ठ क्र. २९१ वर, कलम २१ मध्ये,—

(१) ओळ क्रमांक ५ समोरील डावीकडील समासटिपेमध्ये, " सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० याचे निरसन व व्यावृत्ती. " **या ऐवजी** " सन २००२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० याचे निरसन व व्यावृत्ती. " **असे वाचावे ;**

(२) ओळ क्रमांक ५ समोरील उजव्या समासामध्ये, " सन २००० चा महा. अध्या. १०." **या ऐवजी** " सन २००२ चा महा. अध्या. १०. " **असे वाचावे.**





शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ४४ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, ऑगस्ट २६, २००३/भाद्र ४, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

### अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.**—महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . . . ३०१–३१२

दिनांक २५ ऑगस्ट २००३ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग.

### सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २६ ऑगस्ट २००३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९६५ चा महा. ४०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २००० असे म्हणावे.

...५ चा ...राष्ट्र ...नियम ...क ४० ...लम २ ...रणा.

**२.** महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केलेला आहे), याच्या कलम २ मध्ये,— १९६५ चा महा. ४०.

**(अ)** खंड (२) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(२अ) " धंदा " या संज्ञेत पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(अ) कोणताही व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग किंवा वस्तुनिर्मिती, किंवा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग किंवा वस्तुनिर्मिती याच्या स्वरूपातील कोणताही उद्यम किंवा संस्था–मग असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था ही लाभ किंवा फायदा मिळविण्याच्या उद्देशाने चालविली जात असो किंवा नसो आणि असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था यापासून कोणताही लाभ किंवा फायदा मिळत असो किंवा नसो, आणि असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था याच्या व्यवहारात कोणतेही परिमाण, वारंवारता, सातत्य किंवा नियमितपणा असो किंवा नसो ;

(ब) असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, किंवा वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था, यांच्याशी संबंधित किंवा त्याला आनुषंगिक किंवा सहाय्यकारी असा कोणताही व्यवहार—मग असा व्यवहार भांडवली मत्तांच्या संबंधात असो किंवा नसो आणि तो लाभ किंवा फायदा मिळविण्याच्या उद्देशाने केलेला असो किंवा नसो आणि अशा व्यवहारापासून कोणताही लाभ किंवा फायदा मिळत असो किंवा नसो, आणि अशा व्यवहारात कोणतेही परिमाण, वारंवारता, सातत्य किंवा नियमितपणा असो किंवा नसो ;

(क) ज्यामध्ये मालाच्या नगरपालिका क्षेत्रातील आयातीचा, खरेदीचा किंवा विक्रीचा अंतर्भाव होईल असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था या स्वरूपातील कोणताही प्रासंगिक व्यवहार—मग अशा व्यवहारात कोणतेही परिमाण, वारंवारता, सातत्य किंवा नियमितपणा असो किंवा नसो आणि असा व्यवहार, लाभ किंवा फायदा मिळविण्याच्या उद्देशाने केलेला असो किंवा नसो, आणि अशा व्यवहारापासून कोणताही लाभ किंवा फायदा मिळत असो किंवा नसो ;

(ड) असा व्यापार, वाणिज्य, व्यवसाय, उपभोग, वस्तुनिर्मिती, उद्यम किंवा संस्था सुरू करण्याशी किंवा बंद करण्याशी संबंधित किंवा त्याला आनुषंगिक किंवा सहाय्यकारी असा कोणताही व्यवहार—मग असा व्यवहार लाभ किंवा फायदा मिळविण्याच्या उद्देशाने केलेला असो किंवा नसो, आणि अशा व्यवहारापासून कोणताही लाभ मिळत असो किंवा नसो.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, मनुष्यनिर्मित वने उभारणे किंवा बीजरोपे अथवा रोपे वाढवणे ही कामे धंदा असल्याचे मानण्यात येईल ;";

**(ब)** खंड (३) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(३अ) " उपकर " म्हणजे नगरपालिका क्षेत्रामध्ये उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी त्या नगरपालिका क्षेत्राच्या हद्दींमध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर **प्रकरण नऊ-अ** च्या तरतुदींनुसार बसवलेला उपकर ;";

(क) खंड (८) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

'' (८अ) '' व्यापारी '' म्हणजे जी स्वतःच्या धंद्याच्या प्रयोजनासाठी किंवा स्वतःच्या धंद्याच्या संबंधात किंवा त्या अनुषंगाने नगरपालिका क्षेत्रामध्ये कोणत्याही मालाची कमिशन, पारिश्रमिक यांवर किंवा अन्यथा आयात, खरेदी किंवा विक्री करते अशी कोणतीही व्यक्ती; आणि त्यात पुढील व्यक्तींचा समावेश होतो :—

(अ) जो नगरपालिका क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकर्त्याच्या किंवा प्रकर्त्यांच्या—मग त्यांची माहिती उघड केलेली असो वा नसो—मालकीच्या कोणत्याही मालाची खरेदी करतो, विक्री करतो, त्याचा पुरवठा करतो, त्याचे वितरण करतो किंवा त्याची आयात करतो असा, कोणत्याही नावाने संबोधला जाणारा आणि यात यापूर्वी विनिर्दिष्ट केलेल्या अशा त्याच वर्णनाचा असणारा किंवा नसणारा असा अडत्या, दलाल, कमिशन एजंट, आश्वासक अभिकर्ता किंवा अन्य कोणताही वाणिज्य अभिकर्ता ;

(ब) जो नगरपालिका क्षेत्रामध्ये कोणत्याही प्रकर्त्याच्या—मग त्याची माहिती उघड केलेली असो वा नसो—मालकीच्या मालाची विक्री करतो किंवा लिलाव करतो तो लिलावकार—मग इच्छुक खरेदीदाराचा देकार त्याने किंवा प्रकर्त्याने किंवा प्रकर्त्याच्या नामनिर्दिष्ट व्यक्तीने स्वीकारलेला असो किंवा नसो;

(क) प्रत्यक्षपणे वा अन्यथा मालाची खरेदी, विक्री, पुरवठा, वितरण किंवा आयात (मग ते धंद्याच्या ओघात असो वा नसो) करणारे केंद्र शासन किंवा कोणतेही राज्य शासन ;

(ड) आपल्या सदस्यांसाठी किंवा त्यांच्यावतीने रोख रकमेवर किंवा स्थगित प्रदानावर किंवा कमिशनवर, पारिश्रमिकावर किंवा अन्यथा मालाची आयात, खरेदी, विक्री, पुरवठा किंवा वितरण—मग ते धंद्याच्या ओघात असो वा नसो—करणारी संस्था, क्लब किंवा व्यक्तींचा अन्य संघ (मग ते विधिद्वारा संस्थापित असोत किंवा नसोत) ;

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ,—

**(अ)** अनिवासी व्यापाऱ्याचा नगरपालिका क्षेत्रामध्ये राहणारा जो व्यवस्थापक किंवा अभिकर्ता नगरपालिका क्षेत्रामध्ये मालाची आयात, खरेदी, विक्री, पुरवठा किंवा वितरण करतो अथवा अशा व्यापाऱ्याच्या वतीने,—

१९३० चा ३. (अ) माल विक्रय अधिनियम, १९३० मध्ये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेला वाणिज्य अभिकर्ता म्हणून ; किंवा

(ब) मालाची किंवा मालाच्या संबंधातील हक्कविषयक दस्तऐवजांची हाताळणी करणारा अभिकर्ता म्हणून ; किंवा

(क) मालाच्या विक्रीची किंमत वसूल करण्यासाठी वा देण्यासाठी किंवा अशा वसुलीची वा प्रदानाची हमी देण्यासाठी अभिकर्ता म्हणून,

काम करतो तो व्यापारी किंवा अशा वसुलीसाठी अथवा प्रदानासाठी हमीदार असल्याचे मानण्यात येईल;

**(ब)** खंड (८अ) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पुढीलपैकी जी व्यक्ती व संस्था, मालाची—यामध्ये बेवारशी असलेल्या किंवा सरकारजमा केलेल्या किंवा निकामी झालेल्या, किंवा भंगार, जादा, जुना, अप्रचलित असलेले किंवा काढून टाकलेले सामान किंवा टाकाऊ उत्पादन म्हणून असलेल्या मालाचा समावेश आहे—लिलावाद्वारे वा अन्यथा, प्रत्यक्षपणे किंवा अभिकर्त्यामार्फत रोख रकमेवर किंवा स्थगित प्रदानावर किंवा अन्य कोणताही मुल्यवान मोबदला घेऊन विल्हेवाट लावते ती प्रत्येक व्यक्ती व संस्था व्यापारी असल्याचे मानण्यात येईल :—

(अ) बंदर विश्वस्तमंडळे ;

(ब) महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा आणि इतर स्थानिक प्राधिकरणे;

(क) भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० अन्वये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेले रेल्वे प्रशासन ; १८९० चा ९.

(ड) जहाजवाहतूक, परिवहन व बांधकाम कंपन्या;

(ई) विमान परिवहन कंपन्या व विमान वाहतूक कंपन्या;

(फ) मोटार वाहन अधिनियम, १९८८ अन्वये देण्यात आलेला, भाड्याने वा मोबदल्यादाखल वापरल्या जाणाऱ्या किंवा वापर करण्यासाठी जुळत्या करून घेतलेल्या वाहतूक वाहनांचा परवाना धारण करणाऱ्या, वाहतूक करणाऱ्या व्यक्ती ; १९८८ चा ५९.

(ग) मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम, १९५० अन्वये स्थापन केलेले महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ ; १९५० चा ६४.

(ह) सीमाशुल्क अधिनियम, १९६२ ची अंमलबजावणी करणारा, भारत सरकारचा सीमाशुल्क विभाग; १९६२ चा ५२.

(आय) विमा व वित्तीय महामंडळे किंवा कंपन्या, आणि बँकव्यवसायी कंपन्या ;

(जे) जाहिरात कंपन्या ;

(के) केंद्र शासनाच्या किंवा कोणत्याही राज्य शासनाच्या मालकीचे किंवा त्यांनी स्थापन केलेले अथवा त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेले अन्य कोणतेही महामंडळ, कंपनी, संस्था किंवा प्राधिकरण ;

**अपवाद.**––(एक) केवळ स्वतःच्याच उपभोगासाठी किंवा वापरासाठी माल आयात करणारी कोणतीही व्यक्ती आणि धंद्यामध्ये न गुंतलेला राज्य किंवा केंद्र शासनाचा विभाग हे व्यापारी असणार नाहीत ;

(दोन) जो शेतकरी केवळ त्याने स्वतः कसलेल्या जमिनीत काढलेले कृषि उत्पादन विकतो तो शेतकरी या खंडाच्या अर्थानुसार व्यापारी असल्याचे मानण्यात येणार नाही ;";

**(ड)** खंड १८ नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :––

" (१८-अ१) " आयात करणारा " म्हणजे जी व्यक्ती नगरपालिका क्षेत्रामध्ये उपयोग, उपभोग किंवा विक्री यासाठी नगरपालिका क्षेत्राच्या हद्दींमध्ये कोणताही माल आणते किंवा आणण्याची व्यवस्था करते ती व्यक्ती ;";

**(ई)** खंड (४२) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :––

"(४२अ) " नोंदणीकृत व्यापारी " म्हणजे कलम १४८फ अन्वये नोंदणी करण्यात आलेला व्यापारी;";

**(फ)** खंड (४९) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :––

"(४९अ) " खरेदीची उलाढाल " म्हणजे, व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने एखाद्या विशिष्ट मुदतीत केलेल्या मालाच्या कोणत्याही खरेदीसंबंधात त्या व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने दिलेल्या आणि तिने देय असलेल्या खरेदी किमतीच्या एकूण रकमांतून, विक्रेत्याकडून खरेदी करण्यात आलेल्या आणि सहा महिन्यांच्या मुदतीत त्यास परत करण्यात आलेल्या कोणत्याही मालाच्या संबंधात त्या विक्रेत्याने त्या व्यापाऱ्याला किंवा व्यक्तीला खरेदी किमतीची कोणतीही रक्कम परत केलेली असल्यास ती रक्कम वजा करून राहिलेली रक्कम ;

(४९ब) '' विक्रीची उलाढाल '' म्हणजे, व्यापाऱ्याला किंवा व्यक्तीला एखाद्या विशिष्ट मुदतीत केलेल्या मालाच्या कोणत्याही विक्रीसंबंधात मिळालेल्या व मिळण्यायोग्य असलेल्या विक्री किमतीच्या एकूण रकमांतून, खरेदीदाराने त्याच्याकडून खरेदी केलेल्या आणि सहा महिन्यांच्या मुदतीत त्यास परत केलेल्या कोणत्याही मालाच्या संबंधात त्या व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने खरेदीदाराला विक्री किंमतीची कोणतीही रक्कम परत केलेली असल्यास ती रक्कम वजा करून आणि नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात आलेले असेल त्याबाबतीत, ते ज्या तारखेपासून रद्द होईल त्या तारखेपूर्वी केलेल्या विक्रीच्या संबंधात अशा तारखेनंतर मिळालेल्या किंवा मिळण्यायोग्य असलेल्या रकमा वजा करून राहिलेली रक्कम ; ''.

**३.** मुख्य अधिनियमाचे कलम १०५ मधील, पोट-कलम (१) मध्ये, खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम १०५ ची सुधारणा.

'' (अअ) नगरपालिका क्षेत्रात उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी त्या नगरपालिका क्षेत्राच्या हद्दींमध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर बसवावयाचा उपकर ; ''.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १४८ नंतर पुढील **प्रकरण** व कलमे समाविष्ट करण्यात येतील :— सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये प्रकरण नऊ-अ समाविष्ट करणे.

## '' प्रकरण नऊ-अ

## मालाच्या प्रवेशावर उपकर बसविणे, तो गोळा करणे व त्याची वसुली करणे यासंबंधीच्या तरतुदी.

**१४८अ.** (१) या प्रकरणाच्या आणि नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून, नगरपरिषदेला या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, नगरपरिषद क्षेत्रामध्ये उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी त्या नगरपालिका क्षेत्राच्या हद्दींमध्ये होणाऱ्या, विहित केलेल्या मालाच्या प्रवेशांवर विहित करण्यात येईल इतक्या दराने उपकर बसविता येईल. उपकर बसविणे.

(२) या प्रकरणान्वये उपकर भरण्यास पात्र असलेला प्रत्येक व्यापारी या प्रकरणाच्या व नियमांच्या तरतुदींनुसार उपकर भरील.

(३) मालाच्या प्रवेशावर उपकर बसविणे, तो गोळा करणे आणि त्याची वसुली करणे यासंबंधातील या अधिनियमाच्या तरतुदी ' अ ' वर्ग नगरपरिषदांना व राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करील अशा इतर सर्व नगरपरिषदांना लागू असेल.

**१४८ब.** (१) नगरपरिषदेने ज्या वर्षामध्ये कलम १०५ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेला उपकर बसवण्याचे ठरवले असेल,— उपकराचा भार.

(अ) त्या शासकीय वर्षाच्या लगतपूर्वीच्या शासकीय वर्षामध्ये ; किंवा

(ब) त्या शासकीय वर्षामध्ये,

झालेली, ज्या व्यापाऱ्याच्या सर्व विक्रीची किंवा सर्व खरेदीची किंवा सर्व आयातीची उलाढाल यासंबंधात विहित करण्यात आलेल्या संबद्ध मर्यादेपेक्षा अधिक झालेली असेल किंवा अधिक होत असेल तो प्रत्येक व्यापारी या अधिनियमान्वये उपकर भरण्यास पात्र ठरेल :

परंतु, ज्या व्यापाऱ्याला उप-खंड (अ) लागू होत नसेल, परंतु उप-खंड (ब) लागू होत असेल आणि नगरपरिषदेने उपकर बसविण्याचे ठरविले असेल त्या वर्षाच्या १ एप्रिलनंतर ज्या व्यापाऱ्याची सर्व विक्रीची किंवा सर्व खरेदीची किंवा सर्व आयाताची उलाढाल, विहित करण्यात आलेल्या संबद्ध मर्यादेपेक्षा प्रथमतः अधिक होईल, तो व्यापारी, त्याने नगरपरिषद क्षेत्राच्या हद्दींमधील उपभोगासाठी, उपयोगासाठी किंवा विक्रीसाठी त्या हद्दीमध्ये आयात केलेल्या

मालाच्या संबंधात उक्त वर्षाच्या १ एप्रिलपासून केलेल्या गणनेनुसार त्याची विक्रीची किंवा खरेदीची किंवा आयातीची उलाढाल या संबंधात विहित करण्यात आलेल्या संबद्ध मर्यादेपेक्षा अधिक होत नसेल त्या वेळेपर्यंत उपकर भरण्यास पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये उल्लेखिलेल्या वर्षाच्या नंतरचे शासकीय वर्ष असलेल्या अशा, दिनांक १ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या, कोणत्याही वर्षात ज्या व्यापाऱ्याच्या सर्व विक्रीची किंवा सर्व खरेदीची किंवा सर्व आयातीची उलाढाल ही, या बाबतीत विहित केलेल्या संबद्ध मर्यादेपेक्षा प्रथमच अधिक होईल, तो प्रत्येक व्यापारी या अधिनियमान्वये उपकर भरण्यास पात्र ठरेल :

परंतु, तो व्यापारी, त्याने नगरपरिषद क्षेत्राच्या हद्दीमधील उपभोगासाठी, उपयोगासाठी किंवा विक्रीसाठी त्या हद्दीमध्ये आयात केलेल्या मालाच्या संबंधात उपकर भरण्यास, उक्त वर्षाच्या १ एप्रिलपासून सुरू होणाऱ्या आणि उक्त वर्षाच्या १ एप्रिलपासून केलेल्या गणनेनुसार त्याची विक्रीची किंवा खरेदीची किंवा आयातीची उलाढाल या संबंधात विहित करण्यात आलेल्या संबद्ध मर्यादेपेक्षा अधिक होत नसेल त्या वेळेपर्यंतच्या मुदतीत उपकर भरण्यास पात्र ठरणार नाही.

(३) उपकर भरण्यास पात्र झालेला प्रत्येक व्यापारी त्याची नोंदणी योग्य रीतीने रद्द करण्यात येईपर्यंत अशा रीतीने उपकर भरण्यास पात्र असण्याचे चालू राहील; आणि ज्या दिवशी त्याच्या विक्रीची उलाढाल किंवा खरेदीची उलाढाल किंवा आयातीची उलाढाल ही याबाबतीत विहित केलेल्या संबद्ध मर्यादेपेक्षा पुन्हा प्रथमच अधिक होईल त्या दिवशी तो पुन्हा उपकर भरण्यास पात्र होईल.

विवक्षित माल उपकरापासून सूट मिळण्यास पात्र नसणे.

**१४८क.** (१) नियमांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मालावर कोणताही उपकर बसविता येणार नाही.

(२) नियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मालापैकी कोणत्याही मालासमोर कोणत्याही शर्ती, निर्बंध किंवा अपवाद नमूद केलेले असल्यास त्या शर्ती, निर्बंध किंवा अपवाद यांच्या अधीन राहून त्या मालाला उपकर देण्यातून सूट मिळेल.

विवक्षित बाबतीत उपकर, विषयक दायित्व.

**१४८ड.** जेव्हा नगरपरिषदेने उपकर बसविण्याकरिता निश्चित केलेल्या दिनांकास आणि त्यानंतर, या प्रकरणान्वये उपकर बसवण्यायोग्य असेल असा कोणताही माल (नोंदणीकृत व्यापारी नसणाऱ्या), कोणत्याही व्यक्तीने नगरपालिका क्षेत्राच्या बाहेरील कोणत्याही ठिकाणाहून नगरपालिका क्षेत्राच्या हद्दीमध्ये आयात केला असेल आणि एखाद्या नोंदणीकृत व्यापाऱ्याला विकला असेल तेव्हा, नगरपरिषदेने नियमानुसार वेळोवेळी निश्चित केलेल्या दराने अशा मालावर उपकर बसविण्यात व वसूल करण्यात येईल, आणि असा नोंदणीकृत व्यापारी अशा प्रकारे बसविण्यात आलेला उपकर भरण्यास पात्र असेल :

परंतु, जर अशा खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याने, उक्त मालावर नगरपरिषदेकडे उपकर अगोदरच भरण्यात आलेला आहे असे मुख्य अधिकाऱ्याची खात्री पटेल अशा प्रकारे सिद्ध केले तर त्या मालावर कोणताही उपकर बसविण्यात येणार नाही.

उपकर प्राधिकारी.

**१४८ई.** (१) या प्रकरणाची आणि नियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी मुख्य अधिकारी हा मुख्य प्राधिकारी असेल.

(२) त्याचप्रमाणे, स्थायी समितीला आवश्यक वाटतील तितक्या संख्येतील इतर अधिकारी आणि व्यक्ती यांची नियुक्ती मुख्य अधिकाऱ्यास करता येईल आणि त्यांना स्थायी समितीस योग्य वाटतील अशी पदनामे देता येतील.

(३) मुख्य अधिकाऱ्यास नगर परिषदेच्या प्रादेशिक हद्दीत अधिकारिता असेल. इतर सर्व अधिकाऱ्यांना आणि व्यक्तींना मुख्य अधिकारी विनिर्दिष्ट करील अशा नगरपरिषदेच्या एका किंवा अनेक क्षेत्रात अधिकारिता असेल.

(४) (अ) मुख्य अधिकारी, याला या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये जे अधिकार प्रदान करण्यात आले असतील आणि त्याच्यावर जी कर्तव्ये लादण्यात आली असतील ते सर्व अधिकार त्याला असतील आणि तो ती सर्व कर्तव्ये पार पाडील.

(ब) पोट-कलम (२) अन्वये नियुक्त करण्यात आलेला इतर कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती, अन्यथा करण्यात आलेल्या तरतुदीव्यतिरिक्त या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये जे अधिकार मुख्य अधिकाऱ्यास प्रदान करण्यात आले असतील आणि त्यांच्यावर जी कर्तव्ये लादण्यात आली असतील त्या सर्व अधिकारांचा वापर करील आणि ती सर्व कर्तव्ये पार पाडील.

(५) कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यापाऱ्याला, पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या प्रादेशिक अधिकारितेबाबत हरकत घेण्याचा हक्क असणार नाही.

(६) पोट-कलम (२) अन्वये नियुक्त केलेले सर्व अधिकारी व सर्व व्यक्ती, मुख्य अधिकाऱ्यास दुय्यम असतील.

**१४८फ.** (१) कोणताही व्यापारी या प्रकरणांतील व नियमांतील तरतुदींन्वये उपकर देण्यास पात्र असताना, विहित करण्यात आलेले विधिग्राह्य नोंदणी प्रमाणपत्र त्याच्याकडे नसेल तर तो, व्यापारी म्हणून धंदा करणार नाही : नोंदणी.

परंतु, त्या व्यापाऱ्याने, अशा नोंदणीसाठी, विहित केलेल्या रीतीने व वेळेत अर्ज केल्यानंतर किंवा, यथास्थिति, नोंदणीसाठी केलेला त्यांचा अर्ज निकालात काढण्यात येईपर्यंत विहित कालावधीत, तो असा धंदा करीत असेल तर या कलमाच्या तरतुदींचा भंग झालेला असल्याचे मानण्यात येणार नाही.

(२) एखाद्या व्यक्तीने किंवा व्यापाऱ्याने केलेल्या अर्जावरून, त्या व्यक्तीची किंवा व्यापाऱ्याची नियमान्वये व्यापारी म्हणून नोंदणी करण्यात आली असेल, आणि त्यानंतर, तिची किंवा त्याची अशा रीतीने नोंदणी करावयास नको होती असे आढळून आले तर, ती व्यक्ती किंवा तो व्यापारी, या प्रकरणातील व नियमांतील इतर तरतुदीअन्वये उपकर देण्यास पात्र नसेल, तरीही, तिचे किंवा त्याचे नोंदणी प्रमाणपत्र अंमलात आल्याच्या तारखेपासून, ते रद्द करण्यात येईपर्यंतच्या कालावधीसाठी उपकर देण्यास पात्र असेल.

**१४८ग.** जर,— विक्रीचे किंवा खरेदीचे ज्ञापन.

(अ) एखादा नोंदणीकृत व्यापारी दुसऱ्या नोंदणीकृत व्यापाऱ्यास माल विकील, किंवा

(ब) एखादा नोंदणीकृत व्यापारी चालू वर्षात कोणत्याही एका व्यवहारात कोणत्याही अन्य व्यक्तीस, दहा रुपयांपेक्षा अधिक किंमत असलेला कोणताही माल विकील तर,—

तो त्याने किंवा त्याच्या नोकराने, व्यवस्थापकाने किंवा अभिकर्त्याने अनुक्रमांक व दिनांक यांसह सही केलेले आणि विहित करण्यात येईल असा इतर तपशील दर्शविणारे देयक किंवा रोखीचे टिपण खरेदीदारास देईल, तो अशा देयकाची किंवा रोखीच्या टिपणाची यथोचितरीत्या अनुक्रमांक घातलेली, सही केलेली व दिनांक नमूद केलेली स्थळप्रत किंवा दुसरी प्रत स्वत:कडे ठेवील आणि ती, विक्रीच्या तारखेपासून पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी जतन करील.

**१४८ह.** कोणतीही व्यक्ती, कोणत्याही मालाच्या विक्रीच्या संबंधात उपकराच्या स्वरूपात कोणतीही रक्कम वसूल करणार नाही : उपकर वसूल करण्यास मनाई.

परंतु, एखाद्या व्यक्तीस त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याच्या तरतुदीअन्वये तिच्यावर लादण्यात आलेल्या शर्तीचे आणि निर्बंधांचे अनुपालन करण्यासाठी उपकराची अशी रक्कम स्वतंत्रपणे वसूल करणे आवश्यक असेल, त्या बाबतीत हे कलम लागू होणार नाही.

लेखे ठेवण्याची जबाबदारी.

**१४८आय.** प्रत्येक व्यापारी आणि विहित केलेली अशी अन्य व्यक्ती, तिने आयात केलेल्या, खरेदी केलेल्या, उपभोग घेतलेल्या, उपयोगात आणलेल्या किंवा विकलेल्या मालाच्या किंमतीचा विहित केल्याप्रमाणे खरा लेखा ठेवील.

लेखे व कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणी आणि जागांची झडती, लेखा पुस्तके आणि माल, इत्यादी जप्त करणे.

**१४८जे.** (१) (अ) मुख्य अधिकारी, कोणत्याही नोंदणीकृत व्यापाऱ्यास कोणतेही लेखे किंवा कागदपत्रे त्याच्याकडे सादर करण्यास किंवा त्या व्यापाऱ्याच्या मालाच्या साठ्यासंबंधी किंवा त्याने केलेली मालाची आयात, खरेदी, विक्री आणि पोचवणी यासंबंधी कोणतीही माहिती पुरवण्यास किंवा त्याच्या धंद्यासंबंधीची आवश्यक असेल अशी अन्य कोणतीही माहिती पुरविण्यास भाग पाडू शकेल.

(ब) मुख्य अधिकारी, ज्याने नगरपालिका क्षेत्रात कोणताही माल आयात केला असेल व तो एखाद्या व्यापाऱ्याला किंवा व्यक्तीला विकलेला असेल अशा कोणत्याही व्यापाऱ्यास किंवा कोणत्याही व्यक्तीस, अशा मालाच्या संबंधातील आवश्यक असतील अशी कागदपत्रे सादर करण्यास किंवा अशी माहिती पुरविण्यास भाग पाडू शकेल.

(२) कोणत्याही व्यापाऱ्याच्या मालाच्या साठ्याशी किंवा त्याने आयात केलेल्या, खरेदी केलेल्या, विकलेल्या आणि पोचवणी केलेल्या मालाशी संबंधित असलेले सर्व लेखे, नोंदवह्या व कागदपत्रे, आणि कोणत्याही व्यापाऱ्याने कोणत्याही ठिकाणी ठेवलेला सर्व माल व रोकड, ही सर्व, वाजवी वेळी तपासणीसाठी, मुख्य अधिकाऱ्यास खुली असेल आणि मुख्य अधिकाऱ्यास आवश्यक वाटतील अशा उक्त लेख्यांच्या, नोंदवह्यांच्या किंवा कागदपत्रांच्या प्रती किंवा त्यातील उतारे आणि मालाची आणि रोख रकमेची सूची घेता येईल किंवा घेण्याची व्यवस्था करता येईल.

(३) कोणत्याही व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने त्याच्याकडून किंवा तिच्याकडून येणे असलेल्या कोणत्याही उपकराचे प्रदान चुकविले आहे किंवा ते चुकवण्याचा प्रयत्न करत आहे असे मुख्य अधिकाऱ्यास सकारण वाटले तर, त्याला त्या व्यापाऱ्याची किंवा व्यक्तीची झडती घेताना त्या जागेमध्ये सापडलेले लेखे, नोंदवह्या किंवा कागदपत्रे यांपैकी आवश्यक असतील असे लेखे, नोंदवह्या किंवा कागदपत्रे जप्त करता येतील, आणि त्याबद्दल तो पावती देईल आणि या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात किंवा खटल्याकरता आवश्यक असेल तोपर्यंत ते ठेवून घेईल. तथापि, मुख्य अधिकारी, कोणत्याही व्यापाऱ्याची कोणतीही लेखा पुस्तके, नोंदवह्या किंवा कागदपत्रे किंवा माल, जप्त करील तेव्हा तो तसे करण्याची कारणे लेखी नमूद केल्याशिवाय, ती लेखापुस्तके, नोंदवह्या किंवा कागदपत्रे पंधरा दिवसांपेक्षा जास्त काळ ठेवून घेणार नाही.

(४) पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) च्या प्रयोजनांसाठी, मुख्य अधिकाऱ्यास कोणत्याही व्यापाऱ्याच्या धंद्याच्या कोणत्याही ठिकाणी किंवा एखाद्या व्यक्तीच्या व्यवहाराच्या कोणत्याही ठिकाणी किंवा ज्या अन्य कोणत्याही ठिकाणी तो व्यापारी किंवा व्यक्ती त्याच्या धंद्याचे किंवा व्यवहाराचे कोणतेही लेखे, नोंदवह्या किंवा कागदपत्रे किंवा त्याच्या धंद्याशी संबंधित मालाचा साठा ठेवत असतो किंवा त्यावेळी त्याने ठेवला आहे असे मुख्य अधिकाऱ्यास सकारण वाटेल अशा अन्य कोणत्याही ठिकाणी प्रवेश करता येईल आणि त्या जागेची झडती घेता येईल.

(५) कोणत्याही झडतीच्या किंवा तपासणीच्या वेळी, कोणतीही लेखापुस्तके, इतर कागदपत्रे, पैसा किंवा माल कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असल्याचे आढळून येईल, त्या बाबतीत, एतद्‌विरुद्ध सिद्ध करण्यात आले नाही तर, अशी लेखापुस्तके, इतर कागदपत्रे, पैसा किंवा माल अशा व्यक्तीच्या मालकीच्या असल्याचे समजण्यात येईल.

१९०८ चा ५. **१४८के.** (१) मुख्य अधिकाऱ्यास, या प्रकरणान्वयेची कामे पार पाडण्यासाठी, खालील बाबींच्या संबंधात दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतात तेच अधिकार असतील :— मुख्य अधिकाऱ्यास दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे.

(अ) शपथपत्रावर पुरावा घेणे ;

(ब) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढून बोलाविणे व तिला हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर किंवा प्रतिज्ञाकथनावर तिची तपासणी करणे ;

(क) कागदपत्रांचा शोध घेण्यास किंवा ती सादर करण्यास भाग पाडणे ;

(ड) साक्षीदारांच्या किंवा कागदपत्रांच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढणे ; आणि

(इ) विहित करण्यात येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(२) या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी करावयाच्या कोणत्याही शपथपत्राच्या बाबतीत, मुख्य अधिकाऱ्याने या संबंधात नियुक्त केलेला कोणताही अधिकारी, अभिसाक्षीस शपथ देववू शकेल.

(३) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींस बाध न आणता, विवक्षित ठिकाणी व वेळी एकतर साक्ष देण्यासाठी किंवा लेखापुस्तके, नोंदवह्या किंवा इतर कागदपत्रे सादर करण्यासाठी उपस्थित राहण्याबद्दल जिच्या नावे मुख्य अधिकाऱ्याने समन्स काढले असेल, अशा व्यक्तीने, अशा विवक्षित ठिकाणी व वेळी हजर राहण्याचे किंवा यथास्थिति, अशी पुस्तके, नोंदवह्या किंवा कागदपत्रे सादर करण्याचे हेतुपुरस्सर टाळले असेल त्या बाबतीत, मुख्य अधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशा, पाचशे रुपयांपेक्षा अधिक असणार नाही इतका दंड तिच्यावर लादता येईल व अशा रीतीने बसवण्यात आलेला दंड, उपकराच्या थकबाकीच्या वसुलीसाठी तरतूद केलेल्या रीतीने वसूल करता येईल :

परंतु, असा कोणताही दंड लादण्यापूर्वी, संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(४) मुख्य अधिकाऱ्याने जिच्या नावे समन्स काढले होते त्या व्यक्तीने, कोणतीही कागदपत्रे सादर केली असतील व कोणत्याही व्यक्तीने, तिच्याकडून येणे असलेला कोणताही उपकर चुकवलेला आहे किंवा ती चुकवण्याचा प्रयत्न करीत आहे व सादर करण्यात आलेली कागदपत्रे अशा व्यक्तीविरुद्ध केलेले तथ्यकथन सिद्ध करण्यासाठी आवश्यक आहेत असे मुख्य अधिकाऱ्यास सकारण वाटले तर, मुख्य अधिकाऱ्यास, लेखी नमूद करावयाच्या कारणावरून ती कागदपत्रे अडकवून ठेवता येतील व त्यासाठी तो पावती देईल व या प्रकरणाखालील कोणत्याही कार्यवाहीच्या संबंधात किंवा खटल्यासाठी आवश्यक असेल तितक्या मुदतीसाठी तो ती ठेवून घेईल.

(५) मुख्य अधिकारी किंवा त्याला दुय्यम असलेला कोणताही अधिकारी अथवा व्यक्ती याने या कलमान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशास कोणत्याही न्यायालयात हरकत घेतली जाणार नाही.

**१४८ल.** (१) जो कोणी,— अपराध व शास्ती.

(अ) कलम १४८फ अन्वये नोंदणीकृत व्यापारी नसताना, माल विकताना किंवा विकत घेताना किंवा आयात करताना किंवा मालाची पोचवणी करताना आपण नोंदणीकृत व्यापारी आहोत किंवा होतो असे खोटेच दर्शवील, किंवा

(ब) जाणूनबुजून खोटे विवरण सादर करील, किंवा

(क) कलम १४८जे मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी जाणूनबूजून खोटे देयक, रोखीचे टिपण, प्रमाणक, प्रतिज्ञापत्र, प्रमाणपत्र किंवा इतर कागदपत्र मुख्य अधिकाऱ्याला सादर करील, किंवा

(ड) कलम १४८आय चे उल्लंघन करून त्याने विकत घेतलेल्या किंवा आयात केलेल्या किंवा विकलेल्या अथवा पोचवणी केलेल्या मालाच्या किंमतीचे जाणूनबुजून खोटे लेखे ठेवील, किंवा

(इ) जाणूनबुजून खोटे लेखे, नोंदवह्या किंवा कागदपत्र सादर करील किंवा जाणूनबुजून खोटी माहिती सादर करील, किंवा

(फ) कोणत्याही व्यक्तीला, नियमांच्या संबंधित तरतुदीन्वये आवश्यक असलेले प्रमाणपत्र देईल किंवा जे खोटे आहे असे त्याला माहीत असेल किंवा खोटे असल्याचे सकारण वाटत असेल असे खोटे देयक, रोखीचे टिपण, प्रमाणक किंवा इतर कागदपत्र देईल, किंवा

(ग) या प्रकरणान्वये बसवण्यायोग्य असलेला कोणताही कर चुकविण्यासाठी बुद्धिपुरस्सर कोणत्याही रीतीने प्रयत्न करील, किंवा

(ह) या प्रकरणाच्या तरतुदींखालील कोणताही उपकर, शास्ती, व्याज किंवा जप्त झालेली रक्कम यांचे प्रदान चुकविण्यासाठी बुद्धिपुरस्सर कोणत्याही रीतीने प्रयत्न करील, किंवा

(आय) खंड (अ) ते (ह) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही कृती करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीला सहाय्य करील किंवा अपप्रेरणा देईल, किंवा

(जे) नियमांद्वारे आवश्यक असलेली कोणतीही माहिती देण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील, किंवा

(के) नियमांद्वारे आवश्यक असलेले कोणतेही विवरण विहित केलेल्या तारखेपर्यंत व विहित रीतीने पुरवण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील, किंवा

(ल) या प्रकरणाअन्वये आवश्यक असलेला कोणताही उपकर देण्यात कसूर करील, किंवा

(म) कलम १४८ज अन्वये त्याला आवश्यक करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींचे अनुपालन करण्यात पुरेशा कारणाशिवाय कसूर करील, किंवा

(न) कलम १४८ज अन्वये कोणतीही झडती घेताना किंवा जप्ती आणताना कोणत्याही अधिकाऱ्यास अडथळा आणील, किंवा

(ओ) कलम १४८ फ, १४८ ग, १४८ ह किंवा १४८ आय यांच्या तरतुदींचे पुरेशा आणि वाजवी कारणाशिवाय उल्लंघन करील,—

त्याला, अपराधसिद्धीनंतर दोन वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची आणि दंडाची शिक्षा देण्यात येईल.

(२) जो कोणी पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली कोणतीही कृती करील आणि तो अपराध पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीअन्वये चालू राहणारा असेल तर त्याला अपराधसिद्धीनंतर या कलमान्वये तरतूद करण्यात आलेल्या शिक्षांव्यतिरिक्त आणखी, अपराध करणे चालू राहील त्या कालावधीत दररोज शंभर रुपयांपेक्षा कमी नसेल एवढ्या दंडाची शिक्षा देण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एक वर्षाच्या कालावधीत चुकविण्यात आलेल्या किंवा चुकविण्याचा प्रयत्न करण्यात आलेल्या उपकराची एकूण रक्कम दोनशे रुपयांपेक्षा कमी असेल तर त्या पोट-कलमांमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या कृतींसाठी कोणत्याही व्यक्तीवर त्या पोट-कलमान्वये कार्यवाही करण्यात येणार नाही.

(४) पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेला अपराध केल्याचा आरोप व्यापाऱ्यावर ठेवण्यात आला असेल, त्या बाबतीत अशा व्यापाऱ्याच्या धंद्याचा व्यवस्थापक असल्याचे समजण्यात आलेल्या व्यक्तीने, हा अपराध तिच्या नकळत करण्यात आला होता किंवा तो घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी तिने सर्व उचित खबरदारी घेतली होती असे सिद्ध केले नाही तर ती व्यक्तीदेखील अपराधाबद्दल दोषी असल्याचे समजण्यात येईल.

(५) या प्रकरणाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये मुख्य अधिकाऱ्याकडून ज्या गोष्टींसंबंधात शास्ती लादण्यात आली असेल त्याच गोष्टीसंबंधात, या कलमाखालील अपराधासाठी किंवा कोणत्याही नियमाचा भंग केल्याबद्दल कोणताही खटला दाखल करण्यात येणार नाही.

मुख्य अधिकारी, परिषद अधिकारी किंवा कर्मचारी यांनी माहिती उघड करणे.

**१४८म.** (१) या प्रकरणानुसार किंवा नियमांनुसार केलेल्या कोणत्याही निवेदनातील, पुरविलेल्या कोणत्याही विवरणातील किंवा सादर केलेल्या कोणत्याही लेख्यांतील किंवा कागदपत्रातील किंवा (फौजदारी न्यायालयापुढील कार्यवाही व्यतिरिक्त) या प्रकरणाच्या तरतुदीअन्वयेच्या कोणत्याही कार्यवाहीच्या वेळी दिलेल्या कोणत्याही साक्षीपुराव्याच्या किंवा अभिलेखातील किंवा या प्रकरणाच्या प्रयोजनासाठी तयार करण्यात आलेल्या, कोणत्याही आकारणीच्या, कार्यवाहीच्या किंवा मागणीच्या वसुलीसंबंधीच्या कोणत्याही कार्यवाहीच्या कोणत्याही अभिलेखातील सर्व तपशील, पोट-कलम (३) मध्ये तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत गोपनीय समजण्यात येईल.

(२) पोट-कलम (३) मध्ये तरतूद केली असेल ते खेरीजकरून एरवी, जर कोणत्याही नगरपरिषद कर्मचाऱ्याने, पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या तपशीलापैकी कोणताही तपशील उघड केला तर, त्यास, अपराधसिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(३) या कलमाच्या तरतुदी, नियमांद्वारे विहित केलेल्या प्रयोजनांसाठी उघड करण्यात आलेल्या बाबींच्या बाबतीत लागू होणार नाहीत.

अपराधांबाबत तडजोड करणे.

**१४८न.** (१) मुख्य अधिकाऱ्याला, स्थायी समितीच्या पूर्व मान्यतेने, कलम १४८ल अन्वये शिक्षापात्र असलेल्या अशा कोणत्याही अपराधाबद्दल कार्यवाही दाखल करण्यापूर्वी किंवा दाखल केल्यानंतर, असा आरोप ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अपराधाबाबत तडजोड म्हणून, उपकराची जितकी रक्कम देय झाली असती त्या रकमेच्या चार पट असेल इतकी रक्कम स्वीकारता येईल.

परंतु, असे अपराधाबाबत तडजोड करण्याचे अधिकार दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर केलेल्या अपराधाच्या संबंधात अनुज्ञेय राहणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे रक्कम दिल्यानंतर त्याच अपराधाच्या संबंधात आरोपी व्यक्तीविरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही.

**१४८ओ.** या प्रकरणाच्या तरतुदीन्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल, कोणत्याही नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्याविरुद्ध, कोणताही दावा, खटला किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही दाखल करता येणार नाही. ''.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई